

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २७६ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) | बुधवार १८/११/२०२६ | पाने - ६



शहरातील १५० सीसीटीव्ही कॅमेरे पोलिसांच्या नियंत्रणात

घरफोड्यांसह विनानंबर वाहनांवर कठोर कारवाईचे आमदार सत्यजित तांबे यांचे निर्देश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर शहरात गेल्या काही दिवसांपासून घरफोड्या, चोरीच्या घटना आणि विविध गुन्हेगारी प्रकारांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर विधानपरिषदेचे आमदार सत्यजित तांबे यांनी सोमवारी शहर पोलीस ठाण्यात पोलीस प्रशासनाची बैठक घेऊन कायदा व सुव्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी तब्बल १५० ठिकाणी बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची यंत्रणा पोलिसांच्या नियंत्रणात कार्यान्वित करण्यात आली असून, विनानंबर वाहनांवर कठोर कारवाई, रक्षक दलाच्या जवानांचा पोलिसांनी प्रभावी वापर आणि वाहतूक-पार्किंगच्या प्रश्नावर विशेष उपाययोजना करण्याचे निर्देश तांबे यांनी दिले.

पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे आणि पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीला शहरातील प्रमुख कार्यकर्ते, नगरसेवक आणि काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. संभाव्य दुष्काळी परिस्थितीमुळे आगामी काळात चोरी आणि घरफोड्यांच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलिसांनी आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना करून गुन्हेगारांवर वचक निर्माण करावा, अशी भूमिका आमदार तांबे यांनी मांडली.

संगमनेर नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरात सुमारे १५० ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या सर्व कॅमेऱ्यांचे नियंत्रण, रेकॉर्डिंग आणि थेट दृश्य पाहण्याची व्यवस्था पोलीस ठाण्यात उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, काही तांत्रिक अडचणींमुळे या यंत्रणेचा अपेक्षित वापर होत नव्हता. आमदार तांबे यांनी प्रत्यक्ष पोलीस ठाण्यात जाऊन या अडचणी समजून घेतल्या. संबंधित यंत्रणेतील त्रुटी दूर करून सर्व कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले.

विशेष म्हणजे, या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे कनेक्शन शहरातील स्ट्रीटलाईट व्यवस्थेशी जोडण्यात आले आहे. मात्र, महावितरणकडून राज्यभरात स्ट्रीटलाईट सुरू-बंद करण्याची वेळ केंद्रीय पद्धतीने नियंत्रित केली जात असल्याने सीसीटीव्ही कॅमेरे आणि सिग्नल यंत्रणेवर परिणाम होत होता. याबाबत महावितरणशी चर्चा करून आवश्यक ती व्यवस्था करण्यात आली असून, आता सीसीटीव्ही आणि स्ट्रीटलाईट यंत्रणा कार्यान्वित झाल्याचे तांबे यांनी स्पष्ट केले.

अलीकडील घरफोड्यांच्या घटनांमध्ये विनानंबर प्लेट असलेल्या दुचाकींचा वापर झाल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत आहे. मात्र, नंबर प्लेट नसल्यामुळे अशा वाहनांचा शोध घेणे आणि संबंधितांना पकडणे पोलिसांसाठी आव्हान ठरत आहे. त्यामुळे शहरासह तालुक्यात विनानंबर वाहनांवर विशेष तपासणी मोहीम राबवून कठोर कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना आमदार तांबे यांनी दिल्या. मोठ्या आवाजाचे सायलेन्सर लावणाऱ्या वाहनांवरही कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावणे, घरफोड्या आणि महाविद्यालयीन परिसरातील टवाळखोरांच्या हालचालींवर पोलिसांनी विशेष लक्ष द्यावे, महिलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

संगमनेर शहरातील नवीन नगर रोडसह विविध भागांमध्ये वाहतूक कोंडी (पान ४ वर)

रक्षक दलाचे १२ जवान, गाड्या व दोन बुलेट पोलिसांच्या मदतीला

शहरातील गस्त अधिक प्रभावी करण्यासाठी नगरपरिषदेच्या रक्षक दलाची मदत पोलिसांनी घ्यावी, अशी सूचना तांबे यांनी केली. नगरपरिषदेच्या रक्षक दलाकडे सुमारे १२ जवान, वाहने आणि दोन बुलेट उपलब्ध असून, शहरात नियमित गस्त घालण्याचे काम या माध्यमातून केले जाते. जिल्ह्यातील पोलीस यंत्रणेकडे मनुष्यबळ आणि वाहनांची कमतरता असताना नगरपरिषदेकडून उपलब्ध करून दिलेल्या सुविधांचा नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी वापर होणे आवश्यक आहे. शहर पोलीस ठाण्याकडेही वाहनांची कमतरता असल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. त्यामुळे नगरपालिकेच्या रक्षक दल आणि पोलीस यंत्रणेने संयुक्तपणे गस्त घालावी असे निर्देश देण्यात आले.

ठाकरेंचा शाहांवर हल्लाबोल

पहिले ७० हजार कोटींचे आरोप आता गातात आजितदादांची थोरवी



युवावार्ता (प्रतिनिधी)

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या १४ व्या स्मृतिदिनानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे यांनी विनम्र अभिवादन केले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. अजित पवारांच्या पुतळ्यासमोर अमित शाह यांनी माफी मागायला हवी होती, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

अजित पवार यांच्या हयातीत त्यांच्यावर ७० हजार कोटींच्या कथित घोटाळ्याचे आरोप करून त्यांचे जगणे मुश्किल करण्यात आले. मात्र, आता त्यांच्याच पुतळ्याचे अनावरण करताना अमित शाह यांनी अजित पवारांच्या कार्याची प्रशंसा केली. यावरून उद्धव ठाकरे यांनी शाह यांच्यावर निशाणा साधला. 'अजित पवारांच्या पुतळ्याचे अनावरण केल्यानंतर अमित शहा यांनी पुतळ्यासमोर माफी मागायला हवी होती. आम्ही तुमच्यावर केलेले आरोप खोटे होते, तुम्ही थोर होता, असे त्यांनी म्हणायला हवे होते. अजितदादा हयात असताना त्यांच्याबद्दल असे दोन शब्द बोलले असते, तर त्यांना समाधान मिळाले असते,' असे ठाकरे म्हणाले.कोरोना काळात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना अमित शाह यांनी अनेकदा फोन केले, मात्र ठाकरे फोन उचलत नव्हते, असा दावा शाह यांनी केला होता. यावर पत्रकारांनी विचारले असता, 'मला अमित शहा यांनी अजिबात फोन केला नव्हता. त्यांच्या बोलण्यात काहीही तथ्य नाही,' असे ठाकरेंनी स्पष्ट केले. कोरोना काळात महाराष्ट्राने केलेल्या कामाचा उल्लेख करताना त्यांनी तत्कालीन राज्य सरकार आणि प्रशासनाचे कौतुक केले.





संगमनेरच्या विकासासाठी शिवसेना कटिबद्ध - आ. खताळ




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यात सत्तांतर झाल्यानंतर सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मात्र,आजही अनेक वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असून, नागरिकांना छोट्या-छोट्या प्रश्नांसाठी संघर्ष करावा लागत आहे. तळागाळातील सर्व सामान्य जनतेच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी शिवसेनेच्या शाखा प्रभावीपणे कार्यरत राहतील. विकासकामां बरोबरच प्रत्येक कुटुंबाला न्याय, गरजू व्यक्तींना आधार आणि महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली. शहरालगत कासारा दुमाला शिवारातील भराडवस्ती येथील टेंभी नाका येथे शिवसेना शाखेचे उद्घाटन आमदार खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. (पान ४ वर)









अजितदादांचे आरोपी वाचवणारे नेते म्हणजे देवेंद्र फडणवीस - आ. रोहित पवार यांचा आरोप



मुंबई (वृत्तसंस्था)

अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत आपण विमान कंपनी मालक रोहित सिंह यांना एक मफलरमॅन वाचवत आहेत, असे बोललो होतो. ते मफलरमॅन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. फडणवीस यांनी अजित पवार यांचा घातपात केला, असे आपण म्हणत नाही; पण अजित पवार यांचा अपघात झाला, त्या 'व्हीएसआर' विमान कंपनीच्या मालकाला वाचवणारे नेते फडणवीस आहेत, असा आरोप शरद पवार राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी सोमवारी (दि. १६) केला..

रोहित पवार यांनी पत्रपरिषदेत फडणवीस यांचा मफलर घातलेला फोटो व व्हिडीओ दाखवला. हा फोटो उद्योगपती रोहित सिंह यांच्या लग्न सोहळ्यातील असल्याचा दावा त्यांनी केला. निवडणूक निकालाच्या दिवशी एक विमान मुंबईतून जयपूरला गेले आणि पुन्हा मुंबईत परतले. हे विमान अदानी समूहाचे होते. ते विमान व्ही. के. सिंह व 'व्हीएसआर'शी संबंधित आहे. राजकीय वातावरण अस्थिर असताना ते विमान का उडाले, त्यात कोण होते हे गूढ आहे. सत्य समोर आले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

अजित पवार यांच्या मृत्यूनंतर राज्य सरकारने 'व्हीएसआर'ला १६८ कोटी रुपये का दिले? असा सवाल पवार यांनी केला. विमाने चांगली मिळावीत म्हणून टेंडर काढावे, अशी अजित पवार यांची इच्छा होती; पण ते टेंडर केंद्रीय विमान वाहतूक मंत्रालयातून रद्द करून 'व्हीएसआर'ला दिले गेले. विमान वाहतूकमंत्र्यांचे आणि मुख्यमंत्र्यांचे व्ही. के. सिंह यांच्याशी घनिष्ठ संबंध असतील, तर अजितदादांना न्याय मिळेल का? असा सवाल त्यांनी केला.

अजित पवार यांच्या मृत्यूनंतर २ दिवसांत 'व्हीएसआर'च्या मालकाचा मुलगा रोहित सिंह यांनी अमेरिकेत १८ कोटींचे घर विकत घेतले, याची चौकशी करा, अशी मागणी त्यांनी केली. हा फोटो अनेक दिवसांपासून माझ्याकडे होता. मला राजकारण करायचे नव्हते. फडणवीस यांनी पॉवरचा उपयोग करून त्यांचे मित्र अजित पवार यांना न्याय द्यावा, अशी इच्छा होती. त्यांच्याकडे सीआयडी आहे, सीबीआय आहे, पंतप्रधान त्यांचे ऐकतात; पण तपासच होत नाही. याचे कारण व्ही. के. सिंह यांच्या जवळ मुख्यमंत्री आहेत. आमचे सरकार आले तर त्यांना सोडणार नाही. हा पुतण्या कुणालाही सोडणार नाही, असे ते म्हणाले.

रोहितदादांनी संयम बाळगावा! मित्रत्वाच्या नात्याने आ. तांबेचा सल्ला

स्व. अजितदादा पवार आणि देवेंद्रजी फडणवीस यांच्यातील मैत्री, विश्वास आणि जिव्हाळ्याचे नाते मी जवळून पाहिले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील अनेक चढ-उतारांमध्ये अजितदादांनी दिलेला शब्द पाळण्यासाठी स्वत:च्या राजकीय सोयीपेक्षाही मैत्रीला आणि विश्वासाला अधिक महत्त्व दिले. ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मोठी ताकद होती. अशा अजितदादांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर कोणताही ठोस आधार नसताना या घटनेचा संबंध देवेंद्रजींशी जोडण्याचा प्रयत्न करणे अत्यंत चुकीचे आहे. संवेदनशील प्रसंगाचे राजकीय भांडवल करणे योग्य नाही. रोहितजी, एक अभ्यासू, बुद्धिमान आणि तरुण आमदार म्हणून तुमच्याकडून राज्याला मोठ्या अपेक्षा आहेत. तुमच्यात क्षमता आणि राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत. मात्र प्रत्येक विषयावर तातडीने प्रतिक्रिया देणे आणि सतत टीका-टिप्पणी करणे टाळायला हवे. राजकारणात महत्त्वाकांक्षा असणे चुकीचे नाही; मात्र त्यासोबत संयम, अभ्यास आणि मर्यादांचे भानही आवश्यक आहे.



एक राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून नव्हे, तर तुमच्या पिढीतील सहकारी आणि मित्र म्हणून एवढेच सांगावेसे वाटते की, थोडे सबुरीने घ्या. प्रत्येक विषयाचे गांभीर्य, वेळ आणि परिणाम लक्षात घेऊनच भूमिका मांडावी. राजकारणात प्रत्येक गोष्टीची एक वेळ असते. अनावश्यक घाई करण्यापेक्षा संयम आणि सातत्याला महत्त्व द्या. तसेच, एका फोटोवरून राजकीय आरोप-प्रत्यारोप करणेही योग्य नाही. अनेक राजकीय नेत्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे फोटो समाजमाध्यमांवर उपलब्ध आहेत. या संवेदनशील विषयावर अधिक राजकारण न केलेलेच बरे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त संगमनेरमध्ये शिवसैनिकांकडून अभिवादन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या १४ व्या पुण्यतिथीनिमित्त संगमनेर शहर, तालुका तसेच शिवसेनेच्या अंगीकृत संघटनांच्या वतीने संगमनेर बसस्थानक परिसरात त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख अमित चव्हाण यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी आपण सर्वजण कटिबद्ध असून, त्यांचे विचार समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वातून, कणखर नेतृत्वातून आणि आक्रमक हिंदुत्वाच्या विचारांतून महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने लाखो शिवसैनिकांना प्रेरणा दिली. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना उपस्थित शिवसैनिकांनी त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार व्यक्त केला.

याप्रसंगी शहरप्रमुख अमित चव्हाण, फैसल सय्यद, जिल्हा संघटक अमोल बोऱ्हाडे, विधानसभा शहरप्रमुख बाळासाहेब घोडके, उपजिल्हा संघटक पप्पू कानकाटे, विधानसभा प्रमुख योगेश खेमनर, अश्वी तालुका प्रमुख प्रकाश गायकवाड, तालुका संघटक राजू सातपुते, शहर संघटक आसिफ तांबोळी, उपतालुका प्रमुख दीपक मुळे, बाळासाहेब कवडे, शहर विधानसभा संघटक दीपक साळुंके, युवासेना जिल्हाप्रमुख अक्षय गुंजाळ, युवासेना शहरप्रमुख गोविंद नागरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विजू सातपुते, संभव लोढा, मुस्लिम मावळा अजीज मोमीन, वाहतूक सेना तालुकाप्रमुख अशोक बडे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, विविध अंगीकृत संघटनांचे प्रतिनिधी आणि असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta
SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

काँग्रेसकडून सतेज पाटलांवर सोपवली महत्त्वाची जबाबदारी

दिल्ली (वृत्तसंस्था)

काँग्रेसकडून पाच राज्यांतील आगामी विधानसभा निवडणुकांसाठी स्क्रीनिंग कमिटींची (उमेदवार निवड समिती) घोषणा करण्यात आली आहे. यावेळी महाराष्ट्रातील नेत्यांना महत्त्वाच्या राज्यांची जबाबदारी देण्यात आली आहे.

गोकुळचं मैदान गाजवणारे सतेज उर्फ बंटी पाटील यांची गोव्यात नियुक्ती करण्यात आली आहे. तसंच सचिन सावंत यांची पंजाबमध्ये नियुक्ती केली आहे.

काँग्रेसने सोमवारी उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपूर या निवडणुका होऊ घातलेल्या राज्यांसाठी 'स्क्रीनिंग कमिटी' म्हणजेच छाननी समिती स्थापन केल्या आहेत. उत्तर प्रदेशातील समितीचे प्रमुख म्हणून ज्येष्ठ नेते आणि पक्षाचे खजिनदार अजय माकेन यांची, तर पंजाबमधील



समितीचे प्रमुख म्हणून सिरिव्हेल्ला प्रसाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याव्यतिरिक्त, काँग्रेसने उत्तराखंडमधील स्क्रीनिंग कमिटीच्या प्रमुखपदी पक्षाच्या सरचिटणीस दीपा दासमुन्सी यांची, गोव्यातील समितीच्या प्रमुखपदी कर्नाटकचे मंत्री के. जे. जॉर्ज यांची आणि मणिपूरमधील समितीच्या प्रमुखपदी बी. एम. संदीप यांची नियुक्ती केली आहे.

काँग्रेस अध्यक्षांनी आगामी विधानसभा निवडणुकांसाठी संबंधित राज्यांमध्ये 'स्क्रीनिंग कमिटी' गठित केली असून, हा आदेश त्वरित प्रभावाने लागू होईल, असे एआयसीसी सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे. संबंधित राज्यांचे प्रभारी एआयसीसी सरचिटणीस, प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आणि संबंधित राज्यांच्या प्रभारी सरचिटणीसांसोबत नियुक्त केलेले एआयसीसी सचिव हे या समितीचे पदसिद्ध सदस्य असतील.

उत्तर प्रदेशसाठी गठित स्क्रीनिंग कमिटीचे अध्यक्ष अजय माकेन असतील, तर अस्लम शेख आणि बी. व्ही. श्रीनिवास हे या समितीचे सदस्य असतील. पंजाबमधील समितीचे अध्यक्ष सिरिवेला प्रसाद असतील, तर सचिन सावंत आणि निवेदित अल्वा हे या समितीचे सदस्य असतील. उत्तराखंडमधील समितीचे अध्यक्षपद दीपा दासमुन्सी भूषवतील. तर अनिल चौधरी आणि पाल भाई अंबालिया हे या समितीचे सदस्य असतील.

गोव्यासाठी, काँग्रेस प्रमुखांनी के. जे. जॉर्ज यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली असून, सतेज पाटील आणि शफी परांबिल हे सदस्य असतील. मणिपूरसाठी नेमलेल्या स्क्रीनिंग कमिटीचे अध्यक्ष बी. एम. संदीप असतील, तर हिबी ईडेन आणि राजेश ठाकूर हे या समितीचे सदस्य असतील. निवडणूक आयोगाकडून निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्यापूर्वीच या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. पाचही राज्यांत निवडणुका पुढील वर्षाच्या सुरुवातीला होणार आहेत.

राजूर पोलिसांची मोठी कारवाई

२.७० लाखांचे १५ मोबाईल हस्तगत

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - केंद्र शासनाच्या 'सीईआयआर' पोर्टलचा प्रभावी वापर करत राजूर पोलिसांनी विविध जिल्ह्यांतून २ लाख ७० हजार रुपये किमतीचे १५ गहाळ झालेले मोबाइल शोधून काढले आहेत. सहायक पोलिस निरीक्षक किशोर पवार यांच्या हस्ते हे मोबाइल मूळ मालकांना सुपूर्द करण्यात आले.

राजूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून मोबाइल गहाळ व चोरी होण्याच्या अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. किशोर पवार व त्यांच्या पथकाने याचा तांत्रिक तपास सुरू केला.

'सीईआयआर' पोर्टलवर



छाया- विलास तुपे, राजूर

माहिती भरल्यानंतर हे मोबाइल नाशिक, संगमनेर, मुंबई, रायगड आणि धुळे जिल्ह्यांत सुरू असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी संबंधित व्यक्तींशी संपर्क साधून कायदेशीर प्रक्रियेद्वारे सर्व १५ मोबाइल ताब्यात घेतले. या संपूर्ण मोहिमेत तांत्रिक माहितीचे विश्लेषण करणे, लोकेशनची पडताळणी करणे आणि मोबाइल हस्तगत करण्याच्या प्रक्रियेत महिला पोलिस कॉन्स्टेबल उषा नाडेकर यांनी अत्यंत महत्त्वाची व कौतुकास्पद भूमिका बजावली.

या कारवाईत पो.हे.कॉ. जमना मंडलिक, पो.कॉ. संभाजी सांगळे, विनायक कोकणे, दत्ता परते, नवनाथ नाडेकर, काळे, मुठे आणि राऊत यांनी सहभाग घेतला.

आपले हरवलेले महागडे फोन परत मिळाल्याने तक्रारदार नागरिकांनी समाधान व्यक्त करत राजूर पोलिसांचे आभार मानले आहेत.

न्यायालयाच्या निकालावर वकिलांसह बिलकिस बानोंचा संताप



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

'हे लोक आम्हाला जगू देणार नाहीत का? १७ वर्षे आम्ही लपून राहिलो. २० पेक्षा जास्त घरे बदलली. तेव्हा या ११ दोषींना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. आम्ही थोडे स्थिर होऊ लागतो तोच हे काहीतरी नवीन करून ठेवतात. बिल्किस बानोचा पती याकूबला जेव्हा बिल्किसवर सामूहिक बलात्कार करणाऱ्या दोन दोषींना जामीन मिळाल्याची बातमी समजली, तेव्हा तो एवढेच बोलू शकला.

सर्वोच्च न्यायालयाने २८ ऑक्टोबर रोजी ११ दोषींमधील बिपिनचंद्र जोशी आणि प्रदीप मोधिया यांच्या जन्मठेपेच्या शिक्षेला स्थगिती दिली होती. १६ नोव्हेंबर रोजी ही बातमी समोर आली. बिल्किसची वकील शोभा गुप्ताही म्हणतात- शिक्षेला स्थगिती देऊन जामीन कसा मिळाला, याचे मला आश्चर्य वाटते.बिल्किसचे नातेवाईक रज्जाक, याकूब आणि बिल्किसच्या लढ्यात सुरुवातीपासूनच सोबत आहेत. याकूब आणि बिल्किस बाहेरील जगाशी किंवा माध्यमांशी वकील शोभा गुप्ता आणि रज्जाक यांच्या माध्यमातूनच संपर्क साधतात. सुरक्षेच्या कारणास्तव ते फोनदेखील ठेवत नाहीत.

आम्ही रज्जाकला विचारले की ही बातमी मिळाल्यानंतर याकूब आणि बिल्किस काय म्हणाले. रज्जाक सांगतात, 'याकूब म्हणाला की हे लोक आपल्याला जगू देणार नाहीत का? असे म्हणत तो गप्प झाला.'

'मी विचारले-बिल्किसला सांगितले का? याकूबने उत्तर दिले-नाही. धैर्य होत नाही. तिची भीती पुन्हा जिवंत का करू? तिला सांगू की पुन्हा आपले स्वातंत्र्य हिरावले गेले आहे. पुन्हा लढावे लागेल. भीतीने जगावे लागेल. तिला कळले तर तिला धक्का बसेल. १५ ऑगस्ट २०२२ रोजी हे लोक तुरुंगातून बाहेर आले होते. तेव्हा खुलेआम जल्लोष झाला होता, तेव्हाही बिल्किसला धक्का बसला होता.'

'आमच्या डोळ्यांसमोर हे लोक गळ्यात हार घालून उभे होते. त्यांचे स्वागत असे केले जात होते, जणू काही ते स्वातंत्र्याची लढाई जिंकून आले होते. हो, यावेळी जल्लोष झाला नाही. सर्व काही गुप्तपणे झाले. मागच्या वेळी त्यांच्या जल्लोषाच्या छायाचित्रांमुळेच हे उघड झाले होते. यावेळी त्यांनी हार घातले नाहीत.

गर्भाशयमुखाचा कर्करोग टाळणे शक्य! मग जागरूकतेचा अभाव का?

१७ नोव्हेंबर - जागतिक गर्भाशयमुख कर्करोग निर्मूलन दिन



डॉ. एकता प्रभवती जगदीश वाबळे



कर्करोग म्हटले की भीती वाटणे स्वाभाविक आहे. पण एक असा कर्करोग आहे, ज्याचा प्रतिबंध लसीकरणाने करता येतो, ज्याचे सुरुवातीचे बदल नियमित तपासणीने ओळखता येतात आणि योग्य वेळी उपचार केल्यास जीव वाचवता येतो. तो म्हणजे गर्भाशयमुखाचा कर्करोग (Cervical उरपलशी).

गर्भाशयाच्या खालच्या भागाला, जो योनीमार्गाशी जोडलेला असतो, गर्भाशयमुख (Cervix) म्हणतात. या भागातील कर्करोगाचे प्रमुख कारण म्हणजे Human Papillomavirus (HPV) या विषाणूचा दीर्घकाळ टिकून राहणारा संसर्ग. वक्षत चे काही उच्च-धोकादायक प्रकार, विशेषतः वक्षत १६ आणि १८, गर्भाशयमुखाच्या पेशींमध्ये असामान्य बदल घडवून आणतात. हे बदल अनेक वर्षांत कर्करोगात परिवर्तित होऊ शकतात.

महत्त्वाचे म्हणजे HPV संसर्ग झाला म्हणजे कर्करोग होतोच असे नाही. बहुतांश संसर्ग शरीराची रोगप्रतिकारशक्ती स्वतःहून दूर करते. मात्र संसर्ग दीर्घकाळ टिकल्यास धोका वाढतो. सुरुवातीच्या अवस्थेत या आजाराची कोणतीही लक्षणे नसू शकतात. काही महिलांमध्ये मासिक पाळीच्या दरम्यान रक्तस्राव, लैंगिक संबंधानंतर रक्तस्राव, रजोनिवृत्तीनंतर रक्तस्राव किंवा असामान्य योनीस्राव अशी लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे लक्षणांची वाट न पाहता नियमित तपासणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी HPV लसीकरण ही एक प्रभावी संधी आहे. WHO नुसार ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींना HPV लसीकरणाला प्राधान्य दिले जाते. लैंगिक संबंध सुरू होण्यापूर्वी लस घेतल्यास सर्वोत्तम संरक्षण मिळते. लसीकरणाचे डोस व वेळापत्रक वयानुसार ठरते. मुलींप्रमाणेच मुलांमध्येही HPV लसीकरणाचे महत्त्व आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नियमित स्क्रीनिंग. Pap Smear आणि HPV DN- Test या तपासण्यांद्वारे गर्भाशयमुखातील पूर्व-कर्करोगजन्य बदल ओळखता येतात. हे बदल वेळेत आढळल्यास योग्य उपचार करून कर्करोग होण्यापासून बचाव करता येतो. लसीकरण झाले असले तरी नियमित स्क्रीनिंग आवश्यक आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने २०३० पर्यंत गर्भाशयमुखाचा कर्करोग निर्मूलनाच्या दिशेने नेण्यासाठी ९०-७०-९० हे उद्दिष्ट ठेवले आहे-९०% मुलींचे वयाच्या १५ वर्षांपर्यंत लसीकरण, ७०% महिलांचे वयाच्या ३५ आणि ४५ वर्षांपर्यंत उच्च कार्यक्षमतेच्या चाचणीने स्क्रीनिंग आणि निदान झालेल्या महिलांपैकी ९०% महिलांना योग्य उपचार उपलब्ध करून देणे.

आजही अनेक महिला भीती, संकोच, माहितीचा अभाव किंवा सामाजिक गैरसमजांमुळे या तपासण्या टाळतात. ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. HPV संसर्गाबद्दल लाज किंवा अपराधीपणा बाळगण्याचे कारण नाही. महिलांनी स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देणे आणि कुटुंबानेही त्यांना यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. माझा प्रत्येक महिलेला आणि पालकांना एकच संदेश आहे-मुलींचे वक्षत लसीकरण वेळेत करा, स्वतःची गर्भाशयमुख तपासणी नियमित करा आणि कोणतीही संशयास्पद लक्षणे दुर्लक्षित करू नका. कारण गर्भाशयमुखाचा कर्करोग हा केवळ उपचार करण्याचा विषय नाही, तर प्रतिबंध करून पुढील पिढीला सुरक्षित ठेवण्याची संधी आहे.

कर्करोगमुक्त स्त्री, निरोगी कुटुंब आणि सशक्त समाज-हीच खरी जागरूकता! डॉ. एकता प्रभवती जगदीश वाबळे MBBS, DGO & Fellowship in Infertility (FOGSI) स्त्रीरोगतज्ज्ञ व प्रजनन आरोग्य विशेषज्ञ Mom--ble Fertility IVF Center, संगमनेर

डॉ. एकता जगदीश वाबळे
MBBS, DGO | Fellowship in Infertility (FOGSI)
स्त्रीरोगतज्ज्ञ व प्रजनन आरोग्य विशेषज्ञ
Mom-Able Fertility & IVF Center, संगमनेर

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दुग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

आढळा धरणातून पहिले आवर्तन सुटले

उजव्या कालव्याला २०, डाव्याला १५ क्युसेसने पाणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले धरणाचे पहिले आवर्तन सोमवारी (दि.१६) सकाळपासून सोडण्यात आले. रब्बी पिकांऐवजी चारा पिकांवर जास्तीत जास्त भर शेतकऱ्यांनी द्यावा व उभ्या पिकांना पाण्याचा वापर करावा, असे आवाहन गणोरे व चिकणी पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता प्रवीण भांगरे यांनी केले.

सध्या आढळा धरणात १००१ दलघफू पाणीसाठा शिल्लक असून उजव्या कालव्याला वीस क्युसेस व डाव्या कालव्याला पंधरा क्युसेसने सोडण्यात आले आहे. अनेक गावांचा शेतीचा व पिण्याचा पाण्याचा प्रश्न याच आढळा धरणावर अवलंबून आहे. गणोरे, वीरगाव, हिवरगाव, डोंगरगाव, पिंपळगाव, देवठाण, वरखडवाडी, दोडकनदी तसेच सायखिंडी, निमगाव भोजापूर, चिकणी व वेल्हाळे सावरगाव पाट, समशेरपूर व घोडसरवाडी या सर्व गावांना पिण्यासाठी पाणीपुरवठा याचे धरणातून केला जातो. तसेच अकोले तालुक्यातील सात व संगमनेर तालुक्यातील आठ अशा पंधरा गावांना या धरणातून शेतीसाठी पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे या धरणाचे शेतकऱ्यांच्या दृष्टीने फार महत्त्व मानले जात आहे. दरम्यान, आवर्तनावर चिकणी व गणोरे शाखेचे कर्मचारी लक्ष ठेवून आहेत.

हरिश्चंद्रगडावरून खोल दरीत उडी घेत तरुणाची आत्महत्या

राजस्थानमधील तरुणाचा मृत्यू



छाया- विलास तुपे, राजूर

युवावार्ता(प्रतिनिधी)

राजूर - निसर्गसौंदर्याने नटलेल्या आणि पर्यटकांचे आकर्षण असलेल्या हरिश्चंद्रगडावर एका २० वर्षीय तरुणाने खोल दरीत उडी घेत आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. खुशाल चेनाराम प्रजापती (वय २०, रा. हरसौर, ता. डेगाना, जि. नागौर, राजस्थान) असे मृत तरुणाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, खुशाल प्रजापती हा कोणालाही काहीही न सांगता हरिश्चंद्रगडावर आला होता. १४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १.३० ते १५ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेच्या दरम्यान त्याने गडावरून खोल दरीत उडी घेतली. या घटनेत त्याचा मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मृत तरुणाचे मामा भगवान सहाय गंगाराम प्रजापती (वय ४२, हल्ली रा. दोंडाईचा, ता. सिंदखेडा, जि. धुळे; मूळ रा. अलवास निंबोला कला, ता. डेगाना, जि. नागौर, राजस्थान) यांनी राजूर पोलीस ठाण्यात दिली. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, राजूर येथे दाखल करण्यात आला.

याप्रकरणी राजूर पोलीस ठाण्यात बीएनएसएस कलम १९४ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. राजूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मपोहेकॉ एस. एम. आहेर, पोलीस कॉन्स्टेबल पवार, मुठे व कोकणे यांनी प्राथमिक नोंद व कार्यवाही केली.

दरम्यान, घटनास्थळ टोकावडे पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पुढील तपासासाठी हे प्रकरण ठाणे जिल्ह्यातील टोकावडे पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले आहे. तरुणाने इतक्या टोकाच्या निर्णयामागे नेमके काय कारण होते, याचा अद्याप उलगडा झालेला नाही. या घटनेमुळे हरिश्चंद्रगड परिसरात हळहळ व्यक्त होत असून, टोकावडे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

अवैध कत्तलखान्यावर एलसीबीचा छापा!

१ हजार ४०० किलो गोमांस जप्त, संशयित पसार



संगमनेर (प्रतिनिधी)

संगमनेर शहरातील अवैध कत्तलीचा गंभीर प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. शहरातील जमजम कॉलनी गल्ली परिसरात निळ्या पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या कथित अवैध कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत तब्बल १ हजार ४०० किलो गोमांसासह कत्तलीसाठी वापरण्यात येणारी हत्यारे व साहित्य असा एकूण ४ लाख २२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच कत्तलीमध्ये सहभागी असलेले संशयित घटनास्थळावरून पसार झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संगमनेर शहरातील जमजम कॉलनी गल्ली येथील एका निळ्या पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस साठवून ठेवण्यात आल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी घटनास्थळी गोमांस आणि कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य आढळून आले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत १ हजार ४०० किलो गोमांस जप्त केले.

या कारवाईत ४ लाख २० हजार रुपये किमतीचे गोमांस, तीन चाकू, दोन लोखंडी कुऱ्हाडी आणि एक इलेक्ट्रिक वजनकाटा असा एकूण ४ लाख २२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. मात्र, कत्तल करणारे संशयित पोलिसांच्या हाती लागले नाहीत. त्यामुळे या अवैध कत्तलीमागे नेमके कोण आहे, तसेच या व्यवसायात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे. याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १०९३/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक मुमका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाने ही कारवाई केली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

मुली फक्त पैशांसाठी मागे पळतात इंदोरीकर महाराज पुन्हा अडचणीत

युवावार्ता (प्रतिनिधी)



अकोले- प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर हे त्यांच्या किर्तनांमुळे अधूनमधून चर्चेत असतात. ते अनेकदा महिलांविषयी वादग्रस्त विधान करताना दिसतात. नुकताच इंदूरीकर महाराज यांनी एका किर्तनादरम्यान मुली कधीच मुलावर प्रेम करत नाहीत. त्या केवळ पैशांवर प्रेम करतात असे विधान केले आहे. त्यांच्या या विधानावे नव्या वादाला तोंड फुटले आहे.किर्तन करताना इंदूरीकर महाराज म्हणाले की, असे म्हणतात ती पोरगी माझ्यावर प्रेम करते. तिच्या मेंदूच्या तीन शिरा चोकअप आहेत. तेवढ्या काढून ये. पोरगी कधीच मुलावर प्रेम करत नाही. पोरगी पैशावर प्रेम करते. मुलगी कधीच प्रेम करत नाही. खरं आहे की खोटं आहे. तुम्हाला तिघांना आलेला अनुभव आहे. याला (एका तरुणाकडे इशारा करत) तर मागच्याच महिन्यात मुलीने धोका दिला आहे. खोटं बोलणार नाही.किर्तन करताना इंदूरीकर महाराजांनी स्वत:ची प्रेमाची अशी एक व्याख्या सांगितली आहे. ते म्हणाले की, प्रेम बैगरे या सगळ्या वेगळ्या गोष्टी आहेत. इंदूरीकरची व्याख्या आहे लव्ह इज अ मनी आणि मनी इज अ लव्ह. मनी इज लाइफ आणि लाइफ इज अ मनी. त्यांच्या या विधनाची आता जोरदार चर्चा सुरु आहे.तसेच इंदुरीकर महाराजांनी मोबाईलबाबतही नागरिकांना सल्ला दिला आहे. मोबाईल ही भारी वस्तू असून ते सतत उघडे ठेवू नका असेही इंदूरीकर महाराज म्हणाले. सरकारने दिलेल्या पाच हजार रुपये आणि केंद्राच्या दोन हजार रुपयांमुळे यंदा सर्वांची दिवाळी मोठी झाली असे म्हणत इंदुरीकर महाराजांनी सरकारच्या मदतीचे कौतुक देखील केले..

विद्यार्थी देवो भव : आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिनानिमित्त...



विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थ्यांशिवाय शाळा, शिक्षक आणि शिक्षणसंस्थांना अर्थच उरत नाही. त्यामुळेच विद्यार्थ्यांचे हित, त्यांचा सर्वांगीण विकास आणि उज्ज्वल भविष्य हेच शिक्षणाचे अंतिम ध्येय असले पाहिजे. भारतीय संस्कृतीत आपण 'मातृदेवो भव', 'पितृदेवो भव' आणि 'आचार्यदेवो भव' असे म्हणतो. त्याच धर्तीवर 'विद्यार्थी देवो भव' हा विचारही तितकाच महत्त्वाचा आणि समर्पक आहे.

आज १७ नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हक्क, शैक्षणिक स्वातंत्र्य, सांस्कृतिक मूल्ये आणि लोकशाही तत्त्वांचे जतन करण्याच्या उद्देशाने या दिवसाला विशेष महत्त्व आहे.

या दिवसामागे एक ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. १९३९ मध्ये याच दिवशी नाझी सैन्याने तत्कालीन झेकोस्लोव्हाकियातील विद्यापीठांवर हल्ला केला. विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनानंतर अनेक विद्यार्थी आणि शिक्षकांना दडपशाहीचा सामना करावा लागला. जवळपास एक हजार विद्यार्थ्यांना अटक करून त्यांचा छळ करण्यात आला. या विद्यार्थ्यांच्या बलिदानाची स्मृती जतन करण्यासाठी १७ नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून पाळला जातो.

भारतातही विद्यार्थी दिनाला विशेष महत्त्व आहे. ७ नोव्हेंबर हा दिवस भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनानिमित्त विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. तर १५ ऑक्टोबर हा माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि 'मिसाईल मॅन' डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जागतिक विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. या तिन्ही दिवसांचा उद्देश वेगवेगळ्या ऐतिहासिक संदर्भांशी जोडलेला असला, तरी विद्यार्थ्यांचे महत्त्व अधोरेखित करणे हा त्यातील समान धागा आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. हा अधिकार कोणालाही हिरावून घेता कामा नये. शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याचे, विचारांना दिशा देण्याचे आणि समाजपरिवर्तन घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सन्मान, त्यांचे स्वातंत्र्य आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे.

'विद्यार्थी देवो भव' हा विचार सर्वप्रथम गोखले एज्युकेशन सोसायटीचे तत्कालीन सेक्रेटरी स्वर्गीय सर डॉ. एम. एस. गोसावी यांनी प्रभावीपणे मांडला. शिक्षकांना मार्गदर्शन करताना ते नेहमी सांगत की, विद्यार्थ्यांचा भविष्यकाळ आणि विद्यार्थ्यांचे हित हेच सर्वाधिक महत्त्वाचे आहे. शिक्षकांसमोर बसलेला प्रत्येक विद्यार्थी हेच त्यांचे दैवत आहे. त्या विद्यार्थ्याला घडविणे हेच शिक्षकांचे पवित्र कर्तव्य आहे. शिक्षकांनी आपल्या आचार-विचारांतून विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण केला पाहिजे.

विद्यार्थ्यांना घडविणे म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणे नव्हे, तर त्यांच्यात चांगले गुण रुजविणे आणि दोषांचे निराकरण करणे होय. स्वामी विद्यानंद यांनी संस्काराची केलेली व्याख्या अतिशय समर्पक आहे. ते म्हणतात, 'संस्कार म्हणजे गुणांचा गुणाकार आणि दोषांचा भागाकार!' या एका वाक्यात संस्कारांचे महत्त्व सामावलेले आहे.प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही गुण आणि काही मर्यादा असतात. आळशीपणा, अव्यवस्थितपणा, स्वार्थी वृत्ती, फसवणूक करण्याची प्रवृत्ती, खोटारडेपणा अशा दोषांवर मात करण्यासाठी शिक्षकांनी नियोजनबद्ध प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी शिक्षक प्रयोगशील, संवेदनशील आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधणारे असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक विकास कसा साधता येईल, याचा सातत्याने विचार शिक्षकांनी केला पाहिजे.

शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते अत्यंत पवित्र आहे. या नात्याचा पाया विश्वास, प्रेम, आपुलकी आणि संवाद यांवर उभा असतो. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन केल्यास त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावीपणे घडू शकते. म्हणूनच शिक्षकी पेशा हा केवळ नोकरी किंवा व्यवसाय नसून समाज आणि राष्ट्र घडविण्याचे महान कार्य आहे.

प्रख्यात विचारवंत डॉ. शिवाजीराव भोसले यांनी एकदा म्हटले होते, 'पुढील जन्म जर असेलच आणि तो माझ्या मर्जीने मिळणार असेल, तर मी शिक्षक होणेच पसंत करीन. कारण याच्याइतका पवित्र पेशा दुसरा नाही.' त्यांच्या या विचारातून शिक्षकपदाचे मोठेपण आणि त्यामागील सामाजिक बांधिलकी स्पष्ट होते.

आजच्या बदलत्या काळात विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेत गुण मिळविणारे बनवून चालणार नाही. त्यांना ज्ञाननिष्ठ, विज्ञाननिष्ठ आणि बुद्धिनिष्ठ बनविणे आवश्यक आहे. ज्ञानासोबत कौशल्य, विवेक, सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये आणि संस्कार यांची जोड मिळाली, तरच आदर्श विद्यार्थी घडतील. असे विद्यार्थीच उद्याचे सक्षम नागरिक आणि राष्ट्राचे खरे शिल्पकार ठरतील.

शिक्षण व्यवस्थेच्या प्रत्येक घटकाने विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना प्रोत्साहन द्यावे, पालकांनी त्यांच्या क्षमतांचा आदर करावा आणि समाजाने त्यांना संधी व योग्य वातावरण उपलब्ध करून द्यावे. कारण आजचा विद्यार्थी हाच उद्याचा सुजाण नागरिक, जबाबदार नेतृत्व आणि विकसित राष्ट्राचा आधारस्तंभ आहे.

म्हणूनच 'विद्यार्थी देवो भव' हा केवळ शब्दप्रयोग न राहता तो प्रत्येक शिक्षकाच्या आचारात, प्रत्येक शिक्षणसंस्थेच्या विचारात आणि संपूर्ण समाजाच्या व्यवहारात उतरला पाहिजे. विद्यार्थ्यांचा सन्मान, त्यांचे हित आणि त्यांचे उज्ज्वल भविष्य हेच खऱ्या शिक्षणाचे अधिष्ठान ठरले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सामर्थ्याला, स्वप्नांना आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याला मन:पूर्वक शुभेच्छा!

प्रा. शशांक गंधे सर
संगमनेर, मो. ९८९०१६३६४२

जलसंधारणाची कामे होणार

दुष्काळी गावांना १५ लाखांचे बळ



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्रत्येक ग्रामपंचायतीला १५ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या निधीतून स्थानिक गरजांनुसार जलसंधारण आणि ग्रामविकासाची कामे हाती घेण्यासाठी स्वतंत्र आराखडा तयार केला जाणार असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी केली. त्याचबरोबर वनपट्टा मिळाल्यानंतरही जमिनीचे स्वामित्व न मिळालेल्या आदिवासी शेतकऱ्यांना ७-ई आणि १२-ई प्रॉपर्टी कार्ड देण्याचा निर्णयही त्यांनी जाहीर केला.

पत्रकारांशी संवाद साधताना बावनकुळे यांनी राज्य सरकारच्या दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांची माहिती दिली. ते म्हणाले, दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्यातील ११ विभागांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, जलसंधारण आणि महसूल यांसह विविध विभागांच्या योजनांच्या अंमलबजावणीत बदल करून दुष्काळ निवारणाच्या कामांना प्राधान्य दिले जात आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अनावश्यक कामे थांबवून आवश्यक उपाययोजनांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. चारा संवर्धनापासून जलसंधारणापर्यंत सरकारने आतापर्यंत ४५ ते ४६ निर्णय घेतले असून, त्यातून दुष्काळाचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

प्रत्येक ग्रामपंचायतीला देण्यात येणाऱ्या १५ लाख रुपयांच्या निधीतून गावपातळीवरील गरजांनुसार जलसंधारण आणि ग्रामविकासाची कामे नियोजनबद्ध पद्धतीने करता येतील. यासाठी स्वतंत्र आराखडा तयार केला जाणार आहे. दुष्काळी भागांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढवणे आणि स्थानिक पातळीवर आवश्यक कामे मार्गी लावणे, हा या नियोजनाचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केल त्याचप्रमाणे वनहक्क कायद्यांतर्गत वनपट्टा मिळाला असला, तरी जमिनीचे स्वामित्व दर्शवणारी कागदपत्रे अद्याप न मिळालेल्या आदिवासी शेतकऱ्यांना आता ७-ई आणि १२-ई प्रॉपर्टी कार्ड देण्यात येणार आहेत.

संपादकीय...

आर्थिक साक्षरता ही काळाची गरज!

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात शिक्षण, तंत्रज्ञान आणि आधुनिक जीवनशैली यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, या सर्वांबरोबरच प्रत्येक व्यक्तीला ज्याची सर्वाधिक आवश्यकता आहे, ती म्हणजे आर्थिक साक्षरता. पैसा कमावणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच तो योग्य पद्धतीने खर्च करणे, बचत करणे, गुंतवणूक करणे आणि आर्थिक संकटाच्या काळात त्याचे नियोजन करणेही महत्त्वाचे आहे. दुर्दैवाने, आपल्या शिक्षणपद्धतीत आर्थिक व्यवहारांचे व्यावहारिक ज्ञान अजूनही पुरेशा प्रमाणात दिले जात नाही. त्यामुळे सुशिक्षित व्यक्तीदेखील अनेकदा आर्थिक निर्णय घेताना गोंधळलेली दिसते. ही परिस्थिती बदलण्यासाठी आर्थिक साक्षरतेला केवळ पर्याय म्हणून नव्हे, तर जीवनावश्यक कौशल्य म्हणून स्वीकारण्याची गरज आहे. पूर्वीच्या काळात आर्थिक नियोजन म्हणजे पैसे कमावणे आणि त्यातील काही रक्कम बँकेत किंवा घरात बचत म्हणून ठेवणे, एवढीच मर्यादित संकल्पना होती. मात्र, बदलत्या काळात आर्थिक व्यवहारांचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. बँकिंग, विमा, शेअर बाजार, म्युच्युअल फंड, डिजिटल पेमेंट, कर्जव्यवस्था, निवृत्ती नियोजन अशा अनेक पर्यायांनी आर्थिक जग विस्तारले आहे. या पर्यायांचा योग्य वापर करण्यासाठी त्यांची माहिती असणे आवश्यक आहे. अन्यथा आकर्षक परताव्याच्या जाहिराती, चुकीचे आर्थिक सल्ले आणि फसव्या गुंतवणूक योजनांच्या जाळ्यात सामान्य नागरिक अडकण्याची शक्यता वाढते. आज मोबाईलच्या एका क्लिकवर आर्थिक व्यवहार होतात. भाजी खरेदीपासून मोठ्या व्यावसायिक व्यवहारांपर्यंत डिजिटल पेमेंटचा वापर वाढला आहे. यूपीआय, इंटरनेट बँकिंग आणि विविध वित्तीय ॲप्समुळे व्यवहार सोपे झाले असले, तरी त्याचबरोबर सायबर फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. ओटीपी, बँक खात्याची माहिती, बनावट लिंक आणि अनोळखी फोन कॉलच्या माध्यमातून नागरिकांची आर्थिक फसवणूक केली जात आहे. अनेकदा थोड्याशा निष्काळजीपणामुळे आयुष्यभराची कमाई गमावण्याची वेळ येते. त्यामुळे डिजिटल साक्षरतेबरोबरच आर्थिक सुरक्षिततेचे ज्ञान असणेही अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक साक्षरतेचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे बचतीची सवय आणि खर्चाचे नियोजन. उत्पन्न कितीही असले, तरी खर्चावर नियंत्रण नसेल तर आर्थिक स्थैर्य निर्माण होऊ शकत नाही. आज अनेक कुटुंबांमध्ये उत्पन्न वाढण्याबरोबरच अनावश्यक खर्चाचे प्रमाणही वाढत आहे. क्रेडिट कार्ड, वैयक्तिक कर्ज आणि सहज उपलब्ध होणाऱ्या कर्जाच्या सुविधांमुळे गरजेपेक्षा अधिक खर्च करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. हप्त्यांवर वस्तू खरेदी करण्याची सवय काही वेळा आर्थिक नियोजन बिघडवते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या उत्पन्नानुसार खर्च, बचत, गुंतवणूक आणि आपत्कालीन निधी यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. विशेषतः तरुण पिढीमध्ये आर्थिक साक्षरतेचा प्रसार होणे गरजेचे आहे. शिक्षण पूर्ण करून नोकरी किंवा व्यवसाय सुरू करणाऱ्या तरुणांना पगाराचे नियोजन, करप्रणाली, विमा, गुंतवणूक आणि कर्जाचे व्यवस्थापन याबाबत पुरेशी माहिती नसते. परिणामी, सुरुवातीच्या काळात मिळणारे उत्पन्न योग्य प्रकारे वापरण्याऐवजी दिखाऊ जीवनशैली आणि अनियंत्रित खर्चाकडे त्यांचा कल वाढतो. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर आर्थिक शिक्षणाचा समावेश केल्यास भविष्यात जबाबदार आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिक घडण्यास मदत होईल. ग्रामीण भागात आर्थिक साक्षरतेची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. शेतकरी, छोटे व्यावसायिक, महिला बचत गट आणि असंघटित क्षेत्रातील कामगार यांच्यासाठी बँकिंग, विमा, कर्ज, सरकारी आर्थिक योजना आणि गुंतवणुकीचे ज्ञान महत्त्वाचे आहे. अनेकदा माहितीअभावी नागरिक खासगी सावकारांच्या कर्जाच्या विळख्यात अडकतात. काही जण अधिक परताव्याच्या आमिषाला बळी पडून अविश्वसनीय योजनांमध्ये पैसे गुंतवतात. ग्रामीण भागात बँका, सहकारी संस्था, ग्रामपंचायती आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून आर्थिक साक्षरता अभियान राबविण्याची आवश्यकता आहे.

आदिवासी समाजाचे भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीत मोलाचे योगदान - प्रा. खरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, जल, जंगल आणि जमिनीच्या संरक्षणासाठी तसेच देशाच्या स्वातंत्र्यासाठी भगवान बिरसा मुंडा यांनी दिलेला लढा आणि ब्रिटिशांविरोधात केलेले बंड इतिहासात अजरामर आहे. शेतसारा माफ करण्यासह आदिवासी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील, असे प्रतिपादन आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात यांनी केले. यशोधन कार्यालयाच्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संपूर्ण देशात हा दिवस जनजाती गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. खरात बोलत होते. यावेळी भास्करराव खेमनर, विजय हिंगे, तुषार



गवांदे, प्रशांत गडाख, मोहन दिघे, डॉ. विजय पवार, सुनील गुंजाळ, शंकर गवारी, विठ्ठल मेंगाळ, दिलीप कांबळे, विठ्ठल जाधव, बाळकृष्ण गांडाळ, संगीता मोरे, लक्ष्मण गोरडे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. बाबा खरात पुढे म्हणाले की, जगातील इतर संस्कृतींच्या उदयापूर्वीपासून माणसाला माणूसपणाची जाणीव करून देणारी आणि निसर्गाचे श्रेष्ठत्व जपणारी संस्कृती म्हणजे आदिवासी संस्कृती होय. आदिवासी संस्कृती ही जगाच्या उत्थानाची गंगोत्री मानली जाते. भारतीय संस्कृतीची खरी ओळख जगाला करून देण्यात आदिवासी संस्कृतीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजवाद, स्त्री-पुरुष समानता आणि परस्पर सन्मान या मूल्यांच्या जपणुकीत आदिवासी समाजाचा मोलाचा वाटा आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांचा मूळ स्रोतही आदिवासी संस्कृतीत आढळतो. गुलामगिरी आणि अन्यायाविरोधात आदिवासी समाजाने सातत्याने संघर्ष केला आहे. पर्यावरण संवर्धनाचा विचार प्रत्यक्ष आचरणात आणणारा समाज म्हणून आदिवासी समाजाची ओळख आहे.

सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिवर्तनासाठी केलेल्या आदिवासींच्या उठावाला 'उलगुलान' असे म्हटले जाते. भगवान बिरसा मुंडा यांचे विचार आणि संदेश आत्मसात करून शिक्षणाच्या माध्यमातून विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होऊया, असे आवाहनही प्रा. खरात यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळकृष्ण गांडाळ यांनी केले, तर उपस्थितांचे आभार दिलीप बांबळे यांनी मानले.

नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये १५० पोर्टा कॅबिन दवाखाने उभारणार

आगामी २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे भाविकांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यासाठी आरोग्य विभागाने व्यापक नियोजन सुरू केले आहे. कुंभमेळ्यातील संभाव्य गर्दी, पावसाळी वातावरण आणि संसर्गजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन तीन टप्प्यांमध्ये पोर्टा कॅबिन दवाखाने आणि रुग्णालये उभारण्यात येणार आहेत. या माध्यमातून कुंभपर्वात तब्बल १५० आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

कुंभमेळ्यादरम्यान भाविकांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी तीन प्रकारच्या पोर्टा कॅबिनची उभारणी केली जाणार आहे. पहिल्या प्रकारात बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) सुरू करण्यात येईल. येथे रुग्णांची तपासणी करून आवश्यक औषधोपचार केले जातील. दुसऱ्या प्रकारात तीन खाटांचे छोटे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. यामध्ये डॉक्टरांसाठी स्वतंत्र कक्ष, ऑक्सिजन सुविधा, औषधालय आणि प्रयोगशाळेची व्यवस्था असेल. तिसऱ्या प्रकारातील रुग्णालय घाट परिसरात उभारण्यात येणार असून, येथे अतिदक्षता विभागाची (आयसीयू) सुविधा उपलब्ध असेल. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत, यासाठी खाटा, व्हेंटिलेटर आणि आवश्यक औषधांची व्यवस्था करण्यात येणार आहे. रुग्णाची प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्याला मोठ्या रुग्णालयात हलविण्यात येईल. कुंभमेळ्यातील अमृतस्नानाच्या पर्वण्या पावसाळ्यात येत असल्याने बदलते हवामान, अतिवृष्टी आणि अस्वच्छतेमुळे संसर्गजन्य आजार पसरण्याची शक्यता आहे.

पान १ वरून

शहरातील १५०....

आणि पार्किंगचा प्रश्न गंभीर बनत आहे. यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पुढील आठवड्यात नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने शहरातील सर्व बँका, मोठे व्यापारी, दुकानदार, मॉल्स, हॉस्पिटल्स आणि विविध आस्थापनांच्या प्रतिनिधींची स्वतंत्र बैठक घेण्यात येणार आहे.

बांधकाम परवानगी घेताना इमारतींमध्ये पार्किंगची व्यवस्था दाखविली जाते; मात्र प्रत्यक्षात त्या जागांचा वापर अन्य कारणांसाठी होत असल्याने ग्राहकांची वाहने रस्त्यावर उभी राहतात. अशा प्रकारांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. बँका, हॉस्पिटल्स, मॉल्स आणि मोठ्या दुकानदारांनी आपल्या ग्राहकांच्या वाहनांच्या पार्किंगसाठी स्वतंत्र व्यवस्था करावी, तसेच आवश्यकतेनुसार पार्किंग व्यवस्थापनासाठी कर्मचारी नेमावेत, अशी भूमिका तांबे यांनी मांडली. ग्राहकांनी रस्त्यावर बेशिस्तपणे वाहने लावल्यास त्याची जबाबदारी संबंधित आस्थापनांनीही स्वीकारली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. शहरातील वाहतूक सिग्नल यंत्रणा सुरळीत ठेवणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून कारवाई करणे आणि महत्त्वाच्या चौकांमध्ये वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी करणे यासाठी नगरपरिषद आवश्यक ते सहकार्य करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. शहरातील नागरिकांची सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था आणि वाहतुकीची शिस्त राखणे ही नगरपरिषद व पोलीस प्रशासनाची संयुक्त जबाबदारी आहे. उपलब्ध तंत्रज्ञान, रक्षक दलाचे मनुष्यबळ आणि पोलिसांची प्रभावी कारवाई यांचा समन्वय साधल्यास संगमनेरमधील वाढत्या गुन्हेगारीला निश्चितच आळा बसेल, असा विश्वास आमदार सत्यजित तांबे यांनी व्यक्त केला.

पान १ वरून

संगमनेरच्या ...

यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख रमेश काळ शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, युवा सेना उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे, सचिन शिंदे, गोरख शिंदे, संजय चव्हाण यांच्यासह शिवसैनिक, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, केंद्रात, राज्यात आणि तालुक्यात महायुतीची सत्ता असतानाही काही भागांतील नागरिकांच्या छोट्या-छोट्या समस्या अद्याप प्रलंबित आहेत. या समस्या सोडविण्यासाठी शहरासह तालुक्यात ठिकठिकाणी शिवसेनेच्या शाखा सुरू करण्याचा धडाका सुरू आहे. शिवसेना शाखा सुरू करण्यामागचा उद्देश केवळ पक्षविस्तार नसून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे हा आहे. संगमनेरमध्ये परिवर्तन झाल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला न्याय मिळावा, नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होता यावे आणि त्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावता यावेत, यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करत आहोत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महिलांसाठी लाडकी बहीण योजना, महिलांना मोफत प्रवासाची सुविधा तसेच उच्च शिक्षणाबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. मात्र, काही पात्र महिलांचा लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद झाला असल्यास, त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करून पात्र महिलांना पुन्हा या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

निवडणुका येतील आणि जातील; मात्र पुढील पिढीला उच्च शिक्षण, रोजगार आणि व्यवसायाच्या संधी मिळाल्या पाहिजेत. आजच्या मुलांनी उद्याचे उद्योजक बनून इतरांना रोजगार देणारी पिढी निर्माण करावी. संगमनेरमध्ये आरोग्यसेवेच्या प्रश्नांवरही लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. महिलांसाठी घुलेवाडी येथे १०० खाटांचे रुग्णालय मंजूर झाले असून, लवकरच आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर संगमनेरला भेट देऊन येथील आरोग्यव्यवस्थेचा आढावा घेणार आहेत. औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना ईएसआयसीच्या आरोग्यसेवेसाठी नगर किंवा नाशिक येथे जावे लागू नये, यासाठी संगमनेरमध्येच ही सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यात आला आहे. संबंधित सेवा लवकरात लवकर सुरू करण्याच्या सूचनाही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शासकीय जागांवरील २०११ पूर्वीच्या अतिक्रमणांच्या नियमितीकरणाबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील समितीचे अध्यक्षपद आपल्याकडे आहे. संबंधित नागरिकांकडे आवश्यक पुरावे आणि कागदपत्रे असल्यास त्यांची तपासणी करून नियमानुसार पात्र कुटुंबांच्या घरांच्या नोंदी आणि नियमितीकरणाबाबत दिलासा देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

- अमोल खताळ, आमदार





पाहिजेत
कॅशिअर- २ जागा
अनुभवास प्राधान्य
सावतामाळी नगर, अभंग पेट्रोलपंपशेजारी नवीन अकोले, रोड
9890045755

पाहिजेत
नर्सिंग स्टाफ - बीएससी/जीएनएम (मॉर्निंग-२, इव्हीनींग-२, नाईट - २)
ऑपरेशन थिएटर टेक्निशियन (मॉर्निंग-२, इव्हीनींग-२)
रिसेप्शनिस्ट - (इव्हीनींग-२ ते १०)
डाटा एन्ट्री - बी. कॉम (१ जागा)
मावशी/ वॉर्ड बॉय (२ जागा)
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

पाहिजेत
कामासाठी मुलगा पाहिजे - जागा -१
संगणक ज्ञान (Microsoft Excel, Tally Erp)
Kshitij Electricals & Instrumentation Works
१४११ संगम हाऊसींग सोसायटी, घुलेवाडी, संगमनेर
9822244035

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME MUMTAJ RASHID SIKILKAR
TO NEW NAME MUMTAJ ABDULRASHID SIKILKAR
BY AFFIDAVIT NO 1293/2026 DATE -16/11/2026
ADD- OPPO TO MASJID, BAZAR PETH,CHAKAN, DIST. PUNE,410501

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME RASHID RUSTUMBHAI SIKILKAR
TO NEW NAME ABDULRASHID RUSTUMBHAI SIKILKAR
BY AFFIDAVIT NO 1292/2026 DATE 16/11/2026
ADD- OPPO TO MASJID, BAZAR PETH, CHAKAN, DIST. PUNE,410501

पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397

पाहिजेत
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
सेल्स सुपरवायझर ०१
गोडाऊन सुपरवायझर ०१
– पत्ता–
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
पुरूष – ४ जागा
महिला – २ जागा
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस दिला जाईल
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं. गल्ली, संगमनेर
8669184141

पाहिजेत
गरजू व अनुभवी साईट इंजिनीअर, सुपरवायझर व ऑफिस असीस्टंट पाहिजेत
- संपर्क -
चिंतामणी डेव्हलपर्स
7741057560

पाहिजेत
श्री मारूती देवस्थान माळी समाज पंच ट्रस्ट, माळीवाडा, ता. संगमनेर
संस्थेसाठी व्यवस्थापक नेमणे आहे.
संगणक ज्ञान आवश्यक, निर्व्यसनी
9850387044
9623469373

रिक्त पदे भरणे आहे
MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner
- बिझनेस एक्झिक्युटिव्ह – ४
- कार्यालयीन प्रशासक – १
- आयटी प्रोफेशनल – १
- संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १

पात्रता १२ वी किंवा पदवीधर, संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा २० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह
Contract -
mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

फ्लॅट विकणे आहे!
फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये, किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.
- संपर्क -
8379064040

पाहिजेत
सिद्धार्थ एंटरप्राईजेस
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड संगमनेर
एका नामांकित पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१ कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १ अनुभव असल्यास प्राधान्य
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर (टॅली ज्ञान अवश्यक) जागा -१
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा) नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

पाहिजेत
ड्रायव्हर - २ जागा
आकर्षक वेतन अर्जासह समक्ष भेटणे
श्री बलदेव कन्स्ट्रक्शन
इनसाईड कांकरेज कॉर्नर गणेशनगर, संगमनेर
- संपर्क -
8308015324

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

नाशिक-पुणे रेल्वेसाठी जनसुनावणी घ्या - आ. तांबे

संगमनेरकरांच्या प्रश्नांसाठी आमदार तांबे दर सोमवारी नगरपालिकेत!



संगमनेर - नागरिकांच्या दैनंदिन अडचणी समजून घेऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार सत्यजीत तांबे दर सोमवारी संगमनेर नगरपालिकेत उपस्थित राहून नागरिकांशी तसेच संबंधित अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधतात. संगमनेर सेवा समितीने नगरपालिकेची जबाबदारी स्वीकारल्यापासून गेल्या सात ते आठ महिन्यांपासून हा उपक्रम सातत्याने सुरू आहे. अनेकदा नागरिकांचे छोटे-छोटे प्रश्न योग्य मार्गदर्शनाअभावी प्रलंबित राहतात. अशा प्रश्नांवर संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून ते सोडवण्याचा आपला प्रयत्न असतो, अशी भूमिका आमदार तांबे यांनी मांडली.

संगमनेर तालुक्यातील सात ते आठ गावांमध्ये अद्याप मोबाईल नेटवर्कची समस्या असल्यामुळे शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पीक पाहणी, ई-पीक पाहणी, ऑनलाइन अर्ज, विविध शासकीय योजनांचे अनुदान आणि विद्यार्थ्यांचे ऑनलाइन वर्ग यांसारख्या कामांवर त्याचा परिणाम होतो. कुंभारवाडी गावातील नेटवर्कचा प्रश्न आपण जिल्हा परिषद सदस्य असल्यापासून सातत्याने मांडत होतो. केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, कुंभारवाडी येथे मोबाईल टॉवर उभारण्यास मंजुरी मिळाली आहे. लवकरच गावात मोबाईल आणि इंटरनेट सेवा सुरू होणार असल्याचे लेखी पत्रही प्राप्त झाले आहे. या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही महत्त्वपूर्ण सहकार्य केल्याचे सांगत आमदार तांबे यांनी त्यांचे आणि केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांचे आभार मानले.

नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पाच्या अनुषंगाने डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीला ६० दिवसांची मुदत देण्यात आली होती. ही मुदत संपली असली, तरी या कालावधीत समितीच्या तीन बैठका झाल्या आहेत. समितीने सकारात्मक पद्धतीने अभ्यास करत असेल आणि त्यासाठी आणखी काही वेळ लागत असेल, तर तो देण्याची आमची तयारी आहे. मात्र, या प्रकल्पाबाबत केवळ तांत्रिक बाबींचाच विचार न करता बाधित शेतकरी, स्थानिक नागरिक आणि रेल्वे प्रकल्पाचे समर्थक यांच्या भावना जाणून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे तांबे यांनी स्पष्ट केले.

या प्रकल्पासाठी यापूर्वी पुणे-नाशिक मार्गावर विविध ठिकाणी रास्ता रोको आणि आंदोलने करण्यात आली होती. त्यावेळी समितीला अनावश्यक मुदतवाढ देऊ नये आणि निर्णय प्रक्रियेत जनसुनावणीला महत्त्व द्यावे, अशा दोन प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या होत्या. समितीने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अधिकाधिक बैठका घेऊन तांत्रिक अभ्यास पूर्ण करावा आणि त्याचबरोबर जनसुनावणीच्या माध्यमातून लोकांचे म्हणणे ऐकून घ्यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

संगमनेरच्या सहकाराची ताकद जिल्ह्याने पुन्हा अनुभवली - रणजितसिंह देशमुख

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संपूर्ण जिल्ह्याने पुन्हा एकदा मान्य केले आहे की, संगमनेरचे नेतृत्व, संगमनेर तालुका आणि येथील सहकाराच्या ताकदीशिवाय जिल्ह्यालाही पर्याय नाही. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या माध्यमातून ही बाब पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. राज्यात आपले सरकार नाही, सत्ता आपल्या हातात नाही. मात्र, जिल्हा बँकेच्या निवडणुकीत संपूर्ण जिल्ह्यातील नेते आणि आमदार एकत्र येऊन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडे आले. बँकेचे नेतृत्व आपण करावे, बँकेची जबाबदारी स्वीकारावी, अशी विनंती त्यांनी थोरात यांना केली. त्यानुसार थोरात यांनी ही जबाबदारी स्वीकारून पुढील वाटचाल करण्याचे काम केले. हीच आपल्या सहकाराची खरी ताकद आहे, असे प्रतिपादन जिल्हा बँकेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांनी केले.



देशमुख म्हणाले की, संगमनेर तालुक्यात तब्बल ७१५ सहकारी संस्था आहेत. या संस्था केवळ कागदावर अस्तित्वात नसून प्रत्यक्षात चांगल्या पद्धतीने कार्यरत आहेत. एका बाजूला संपूर्ण जिल्हा असताना काही तालुक्यांमध्ये १२५, तर काही तालुक्यांमध्ये २५० सहकारी संस्था आहेत. कोपरगाव तालुक्यात सुमारे ५३०, तर नगर तालुक्यात ४०० संस्था आहेत. मात्र, संगमनेर हा जिल्ह्यातील एकमेव तालुका आहे, जिथे ७१५ सहकारी संस्था कार्यरत आहेत. हीच संगमनेरच्या सहकाराची खरी ताकद आहे. जिल्ह्यानेही या ताकदीची दखल घेत संगमनेरच्या नेतृत्वाशिवाय पर्याय नसल्याचे दाखवून दिले आहे.

ही ताकद केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नाही, तर जिल्हा बँकेच्या निवडणुकीतूनही ती स्पष्ट झाली आहे. आपल्या पॅनलला तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर मतदान झाले. संगमनेर तालुक्यातील सुमारे ८८ टक्के मतदान आपल्या बाजूने झाले, तर केवळ १० ते १२ टक्के मतदान विरोधात गेले. या मतदानातून सहकार क्षेत्रातील एकजूट आणि नेतृत्वावरील विश्वास दिसून आला. या निवडणुकीच्या माध्यमातून संगमनेरच्या सहकाराची ताकद संपूर्ण जिल्ह्याच्या लक्षात आली आहे. स्वर्गीय सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात आणि त्यांच्या जुन्या सहकाऱ्यांनी संगमनेरमध्ये खऱ्या अर्थाने सहकाराची भक्कम उभारणी केली. केवळ सहकारी संस्था स्थापन केल्या नाहीत, तर त्या कशा पद्धतीने चालवाव्यात, याची शिस्तही त्यांनी घालून दिली. संस्थांचे कामकाज कसे असावे, नियोजन कसे करावे, पारदर्शकता कशी राखावी, याबाबत त्यांनी आदर्श नियमावली तयार केली. आजही याच शिस्तीने आणि पारदर्शकतेने तालुक्यातील सहकारी संस्था काम करीत आहेत.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २५ ते ३० वर्षांपासून या सहकारी संस्थांची यशस्वी वाटचाल सुरू आहे. भाऊसाहेब थोरात यांनी घालून दिलेला सहकाराचा आदर्श आणि शिस्त पुढे नेण्याचे काम बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. त्यांचे सहकारी संस्थांच्या कामकाजाकडे नेहमीच बारकाईने लक्ष असते. सहकार हीच संगमनेरची खरी ताकद असून, जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या माध्यमातून या ताकदीचा अनुभव संपूर्ण जिल्ह्याला आला आहे.

तालुक्यातील सहकारी संस्था आणि बाळासाहेब थोरात यांचा प्रतिनिधी म्हणून मला जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षपदावर काम करण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी अभिमानाची आणि भाग्याची बाब आहे. स्वर्गीय सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हा बँकेत ज्या पदांवर काम केले, त्याच पदावर काम करण्याची संधी मला मिळाली आहे. आपण आमच्यावर जो विश्वास दाखविला आहे, त्या विश्वासाला आम्ही पूर्णपणे पात्र ठरू. संगमनेरच्या सहकाराच्या परंपरेला आणि लौकिकाला साजेसे काम जिल्हा बँकेत करून दाखवू.

– रणजितसिंह देशमुख, उपाध्यक्ष, जिल्हा बँक

अंभोरेत शेतकरी वस्तीवर दरोडा !

धारदार शस्त्राचा धाक दाखवून रोकड, तीन तोळे सोन्याचे दागिने लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्यातील अंभोरे येथे चोरट्यांनी धुमाकूळ घालत शेतकऱ्याच्या वस्तीवर मध्यरात्री दरोडा टाकल्याची धक्कादायक घटना घडली आहे. धरण रस्त्यावरील शेतकरी रंगनाथ सोडनर यांच्या वस्तीवर चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास प्रवेश करून घरातील सदस्यांना धारदार शस्त्राचा धाक दाखविला. त्यानंतर सुमारे २० ते २५ हजार रुपयांची रोख रक्कम आणि जवळपास तीन तोळे सोन्याचे दागिने लंपास केले. एवढ्यावरच न थांबता घरातील वृद्ध महिलेच्या गळ्यातील दागिनेही जबरदस्तीने ओरबाडून नेल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, रात्री दीड वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी रंगनाथ सोडनर यांच्या घरात प्रवेश केला. अचानक घरात घुसलेल्या चोरट्यांनी कुटुंबीयांना धारदार शस्त्राचा धाक दाखवत दहशत निर्माण केली. त्यानंतर घरातील कपाटे आणि पेटचांची उचकापाचक करून रोख रक्कम व सोन्याचे दागिने शोधून काढले. यावेळी अंदाजे २० ते २५ हजार रुपयांची रोकड आणि जवळपास तीन तोळे सोन्याचे दागिने चोरट्यांनी ताब्यात घेतले.

दरम्यान, चोरट्यांनी घरातील वृद्ध महिलेच्या गळ्यातील दागिन्यांवरही हात साफ केला. धारदार शस्त्राचा धाक दाखवून तिच्या गळ्यातील दागिने जबरदस्तीने ओरबाडून नेले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे सोडनर कुटुंबीय प्रचंड घाबरले. घरात आरडाओरडा सुरू झाल्यानंतर शेजारील वस्तीवरील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. मात्र, अंधाराचा फायदा घेत चोरट्यांनी घटनास्थळावरून पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच संगमनेर तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसराची पाहणी करून पंचनामा केला असून, चोरट्यांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू केला आहे. मध्यरात्री शेतवस्तीवर घडलेल्या या घटनेमुळे अंभोरे परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागात शेतकरी कुटुंबे अनेकदा गावापासून दूर, एकाकी वस्त्यांवर राहतात. रात्रीच्या वेळी परिसरात असणारा अंधार आणि वस्तींचे एकाकीपण याचा फायदा घेत चोरटे अशा ठिकाणांना लक्ष्य करत असल्याचे या घटनेतून पुन्हा समोर आले आहे. विशेष म्हणजे घरातील वृद्ध महिलेलाही चोरट्यांनी लक्ष्य केल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. अंभोरे येथील दरोड्यातील आरोपींचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, तसेच ग्रामीण भागातील रात्रीची पोलिस गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल (डॉ. जठार)
डॉ. नितीन जठार — एम.बी.बी.एस., डी.टी.सी.डी. कन्सल्टंट फिजिशियन तज्ज्ञ : खालीची हृदय रोग टी.बी. व दम्याचे विकार
डॉ.सौ. उज्वला जठार — एम.बी.बी.एस., डी.सी.एच. कन्सल्टंट पीडियाट्रिशियन तज्ज्ञ : बालरोग, नवजात अर्भक इंटेन्सिव्युअर बेबी केअर
अत्याधुनिक कॅथलॅब (Cath Lab)
शुभ दिपावली
दिवावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
२४ तास सुविधांसाठी ☎ 02425 - 224761 | 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

ठुरुनि
ऐक्सक्लुझिव्ह मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग: अतिदक्षता विभाग • अपघात विभाग
डायलिसीस विभाग: सुपर स्पेशालिटी विभाग • न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग: मेडिसीन विभाग • अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट: स्पाईन सर्जरी • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अॅम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

रजनीश मोहन कडलग यास भावपूर्ण श्रद्धांजली

गगनाला गवसणी घालण्याआधीच निखळलेला एक तेजस्वी तारा!



॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

बुद्धिमत्ता, जिद्द, उद्योजकतेची स्वप्ने आणि कर्तृत्वाची अफाट भूक असणाऱ्या अवघ्या वीस वर्षांच्या तरुणाचा काळजाला चटका लावणारा जीवनप्रवास! काही स्वप्ने डोळ्यांतच राहतात, काही स्वप्नांना पंख फुटतात; पण नियतीच्या एका निर्दयी आघाताने त्या पंखांची भरारी अर्ध्यावरच थांबते. काही माणसे आयुष्यात फार काळ सोबत नसतात मात्र आपल्या कर्तृत्वाचा आणि आठवणींचा सुगंध आयुष्यभर मागे ठेवून जातात. रजनीश कडलग हा असाच एक विलक्षण तरुण...! काही तारे असे असतात, जे क्षितिजावरून उगवतात, आकाशाला गवसणी घालण्याआधीच मात्र निखळून जातात. त्यांचा प्रकाश क्षणभराचा असला तरी, त्यांच्या तेजाची आठवण आयुष्यभर मनात राहते...!

बालपणापासूनच सर्वांचा लाडका...

दिनांक २५ सप्टेंबर २००४ रोजी वडगाव पान येथील आपल्या आजोळी रजनीशचा जन्म झाला. पंचायत समिती संगमनेरच्या शिक्षण विभागात सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून कार्यरत असणारे वडील मोहनराव कडलग आणि डी. के. मोरे जनता विद्यालय, वडगाव पान येथे माध्यमिक शिक्षिका म्हणून कार्यरत असणाऱ्या आई भारती मोहन कडलग यांच्या आयुष्यात रजनीशच्या आगमनाने आनंदाची नवी पहाट उजाडली. मोठा भाऊ नचिकेत आणि लहानगा रजनीश अशा दोन भावांच्या सहवासाने कुटुंबाचा आनंद द्विगुणित झाला होता. आजोबा भैय्यासाहेब मोरे, आजी स्नेहलता, मामा लक्ष्मण आणि योगेश मोरे यांनी दोन्ही नातवांना जीवापाड जपले. आजोळच्या मायेच्या सावलीत रजनीशचे बालपण अतिशय लाडाकोडात गेले. गोरापान, राजबिंडा, देखणा आणि राजकुमारासारखे व्यक्तिमत्त्व लाभलेला रजनीश लहानपणापासूनच सर्वांचा लाडका होता. थोडासा हट्टी, पण तितकाच प्रेमळ आणि मनमिळाऊ! आपल्या गोड बोलण्याने आणि निरागस स्वभावाने तो घरातील प्रत्येकाचा लाडका बनला होता. त्याचे छोटे छोटे हट्ट पुरविण्यातच कुटुंबीयांचा आनंद सामावलेला होता. आज त्याच्या बालपणीच्या आठवणी डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या की, घरातील प्रत्येक कोपरा त्याच्या अस्तित्वाची साक्ष देतो. त्याचे हसणे, बोलणे, लाड करणे, हट्ट धरणे आणि सगळ्यांना आपलेसे करणे... या आठवणी आता केवळ आठवणी राहिल्या आहेत ही जाणीवच मनाला असह्य वेदना देणारी आहे.

शिक्षणासोबतच अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा विकास

संगमनेर येथील नामांकित स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये रजनीशने दहावी पर्यंतचे शिक्षण घेतले. शालेय जीवनापासूनच त्याच्यातील बुद्धिमत्ता, जिज्ञासू वृत्ती आणि विविध क्षेत्रांत काहीतरी वेगळे करण्याची ओढ प्रकर्षाने जाणवत होती. अभ्यासाबरोबरच फुटबॉल, टेनिस, बुद्धिबळ आणि संगीत या क्षेत्रांत त्याला विशेष रस होता. खेळातील चपळता, बुद्धिबळातील विचारांची खोली आणि संगीताविषयीची संवेदनशीलता यांचा सुंदर संगम त्याच्या व्यक्तिमत्त्वात होता. विशेष म्हणजे, अगदी लहान वयातच तासन्तास लायब्ररीमध्ये बसून रामायण, महाभारत आणि इतर विविध ग्रंथांचे वाचन करण्याची त्याला आवड होती. आजच्या मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आकर्षणात अडकलेल्या पिढीमध्ये वाचनाची अशी विलक्षण ओढ असणारा रजनीश खरोखरच वेगळा होता. त्याला केवळ पुस्तके वाचायची नव्हती तर त्यातून विचारांची नवी क्षितिजे शोधायची होती.

आपल्या बुद्धिमत्तेने, विनम्र स्वभावाने आणि सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवण्याच्या वृत्तीने त्याने शाळेतील सर्वांची मने जिंकली. संस्थेचे अध्यक्ष संजोत वैद्य तसेच शिक्षकवृंदांचा तो अत्यंत आवडता विद्यार्थी होता. त्याच्या अंगी असणारी गुणवत्ता आणि भविष्यात काहीतरी मोठे करण्याची क्षमता शिक्षकांनीही अचूक ओळखली होती.

पुस्तकांच्या पानांतून त्याने विश्व शोधले,
ज्ञानाच्या प्रकाशात स्वतःचे भविष्य घडविले.
वय लहान होते, पण विचार आभाळाएवढे,
स्वप्नांच्या क्षितिजावर त्याने ध्येयांचे रंग भरले...!

अभियांत्रिकी शिक्षण आणि स्वप्नांना नवी दिशा

बारावीनंतर उच्च शिक्षणासाठी रजनीशने पुण्यातील नामांकित विश्वकर्मा विद्यापीठात (Vishwakarma University) बी.टेक. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. नवीन शहर, नवीन शैक्षणिक वातावरण, वेगवेगळ्या प्रांतांतील विद्यार्थी आणि तंत्रज्ञानाचे विस्तारणारे विश्व... या सर्व गोष्टींशी त्याने अल्पावधीतच जुळवून घेतले. महाविद्यालयीन जीवनातही त्याने आपल्या वक्तृत्वाने, खेळातील सहभागाने, अभ्यासातील गुणवत्तेने आणि मित्रांना मदत करण्याच्या वृत्तीने असंख्य मित्र जोडले. त्याच्याकडे केवळ स्वतःच्या प्रगतीचा विचार नव्हता तर आपल्या सोबतच्या प्रत्येकाने पुढे जावे ही भावना होती.

त्याच्या मनात एक वेगळाच विचार सतत घोळत असे. पारंपरिक अर्थाने केवळ शिक्षण पूर्ण करून नोकरी मिळवणे, एवढेच त्याचे ध्येय नव्हते. त्याला स्वतःची ओळख निर्माण करायची होती. स्वतःचा उद्योग उभा करायचा होता. रोजगारनिर्मिती करायची होती आणि आपल्या कुटुंबाचे, गावाचे व देशाचे नाव जगाच्या नकाशावर पोहोचवायचे होते. तो नेहमी आत्मविश्वासाने म्हणायचा, मला नोकरी करून शरीर झिजवायचे नाही, तर व्यवसाय करून माझ्या घरचे, गावाचे आणि देशाचे नाव जगात मोठे करायचे आहे. त्याच्या या एका वाक्यात त्याची महत्त्वाकांक्षा, आत्मविश्वास आणि उद्योजकतेची जिद्द सामावलेली होती.

वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी उद्योजकतेची भरारी! रजनीशच्या आयुष्यातील सर्वांत उल्लेखनीय बाब म्हणजे त्याने केवळ स्वप्ने पाहिली नाहीत, तर ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कृतीही सुरू केली. अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षात शिकत असतानाच त्याने कोडिंगचे तंत्रज्ञान आत्मसात केले आणि प्रत्यक्ष उद्योगविश्वात पाऊल ठेवले. जानेवारी २०२४ मध्ये त्याने 'Nelcus AI' नावाची स्वतःची पहिली सॉफ्टवेअर कंपनी स्थापन केली. अवघ्या वीस वर्षांच्या वयात स्वतःची कंपनी सुरू करण्याचे धाडस दाखविणारा रजनीश खऱ्या अर्थाने ध्येयवेडा होता. समाजातील दैनंदिन समस्यांकडे तो केवळ अडचणी म्हणून पाहत नसे तर त्या सोडविण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग कसा करता येईल, याचा विचार करीत असे. पुण्यासारख्या महानगरातील पार्किंगची गंभीर समस्या त्याच्या लक्षात आली. या समस्येवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रभावी उपाय शोधण्याच्या उद्देशाने त्याने 'Parker' हे सॉफ्टवेअर विकसित केले. या संकल्पनेला जागतिक स्तरावर पोहोचविण्याचे त्याचे स्वप्न होते. जगभरातील कोट्यवधी लोकांच्या उपयोगाचे तंत्रज्ञान निर्माण करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. इतकेच नव्हे, तर घरापासून दूर राहणाऱ्या नोकरदार व्यक्ती आणि विद्यार्थ्यांना सकस, स्वच्छ व घरगुती जेवण मिळावे, तसेच घरगुती महिलांना त्यांच्या पाककलेच्या माध्यमातून रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाची संधी मिळावी, या सामाजिक जाणिवेतून तो 'Cravei' या स्टार्टअपचा सह-संस्थापक (Co-Founder) बनला. त्याच्या या व्यवसायामागे केवळ आर्थिक नफा मिळविण्याचा उद्देश नव्हता. व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही भाग गोरगरीब, वंचित आणि गरजू व्यक्तींच्या मदतीसाठी वापरून समाजासाठी भरीव योगदान देण्याचे त्याचे स्वप्न होते. म्हणजेच, स्वतः मोठे व्हायचे आणि त्याचबरोबर इतरांनाही मोठे होण्याची संधी द्यायची हा त्याचा विचार होता. स्वतःच्या यशासाठी नव्हे, तर समाजाच्या उन्नतीसाठी धडपडणारा, स्वतःच्या स्वप्नांसोबत इतरांच्याही स्वप्नांना बळ देणारा.

व्यवसायात यश मिळवून माणुसकीचे नाते जपायचे, अशा उदात्त विचारांनी त्याने आयुष्याचे ध्येय ठरवायचे...!

आईला जग फिरवून आणण्याचे स्वप्न...

रजनीशच्या आयुष्यातील सर्वांत हृदयस्पर्शी पैलू म्हणजे आई-वडिलांविषयी असणारे त्याचे अपार प्रेम आणि त्यांच्यासाठी काहीतरी मोठे करण्याची त्याची तळमळ. अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षात असताना त्याच्या कामाचा व्याप प्रचंड वाढला होता. शिक्षण, स्वतःची कंपनी, स्टार्टअप, नवीन प्रकल्प, क्लायंट्स आणि भविष्यातील व्यावसायिक नियोजन... या सर्व गोष्टींमध्ये तो अक्षरशः झोकून देऊन काम करीत होता. त्याचा हा वाढता व्याप पाहून आई-वडिलांनी त्याला थोडे थांबण्याचा, स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्याचा आणि कामाचा ताण कमी करण्याचा



सल्ला दिला होता. परंतु त्याच्या डोळ्यांत भविष्याची स्वप्ने चमकत होती. तो आईला मोठ्या आत्मविश्वासाने सांगायचा, आई, आता माझा सेटअप तयार झाला आहे. दोन वर्षे मी अहोरात्र मेहनत घेतली आहे. फक्त थोडे दिवस थांब. मी तुला विमानातून संपूर्ण जग फिरवून आणेन आणि तुझी प्रत्येक हौस-मौज पूर्ण करेन. आईसाठी विमानप्रवासाचे स्वप्न पाहणारा हा मुलगा स्वतःच्या सुखापेक्षा आईच्या आनंदाला अधिक महत्त्व देत होता. आईच्या चेहऱ्यावरचे समाधान, तिच्या इच्छा पूर्ण करण्याचा आनंद आणि कुटुंबाला सुखाचे दिवस दाखविण्याची आस त्याच्या प्रत्येक प्रयत्नामागे होती. आज त्याचे हे शब्द आठवले की आईच्या काळजात वेदनेचा डोंगर कोसळतो. ज्या मुलाने आईला जग फिरवून आणण्याचे स्वप्न दाखविले, तोच मुलगा आज आईच्या नजरेआड अनंताच्या प्रवासाला निघून गेला आहे.

आईसाठी त्याने आभाळाएवढे स्वप्न पाहिले,
तिच्या प्रत्येक इच्छेला स्वतःचे ध्येय मानले.
विमानातून जग फिरविण्याचे वचन दिले होते,
पण नियतीने त्याला आईपासूनच दूर नेले...!

दिवाळीच्या प्रकाशात नियतीचा काळाकुट्ट अंधार... रजनीशच्या कर्तृत्वाला आता खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळू लागली होती. त्याला अमेरिकेतील क्लायंट्ससोबत काम करण्याची संधी मिळाली होती. त्याच्या मेहनतीचे चीज होत होते. त्याने पाहिलेली स्वप्ने प्रत्यक्षात साकार होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली होती. ऐन दिवाळीचा सण होता. सर्वत्र आनंदाचे, उत्साहाचे आणि प्रकाशाचे वातावरण होते. महाविद्यालयातील मित्र आपापल्या घरी दिवाळी साजरी करण्यासाठी निघाले होते. मात्र, पुण्यातील काही क्लायंटनी दिलेला प्रोजेक्ट निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या ध्यासाने रजनीश पुण्यातील आपल्या फ्लॅटवर एकटाच थांबला होता. दिवस-रात्र काम, सतत संगणकासमोर बसणे, प्रोजेक्ट पूर्ण करण्याची घाई आणि स्वतःला सिद्ध करण्याची प्रचंड जिद्द... या सगळ्यांत तो इतका गुंतून गेला की तहान-भुकेचेही भान राहिले नाही. कामाच्या ओढीने त्याने आपल्या शरीराकडे आणि आरोग्याकडे दुर्लक्ष केले. आई-वडिलांनी दिलेला विश्रांतीचा सल्ला, वेळेवर जेवण्याची गरज आणि स्वतःची काळजी घेण्याचे महत्त्व या गोष्टींचे महत्त्व कदाचित त्या ध्येयवेड्या तरुणाच्या लक्षात येत नव्हते.

अखेर नियतीने असा काही क्रूर डाव साधला की, एका कुटुंबाचे संपूर्ण विश्वच उद्ध्वस्त झाले. ९ नोव्हेंबर : आयुष्यभर न विसरता येणारा काळा दिवस! दिनांक ९ नोव्हेंबर... हा दिवस कडलग कुटुंबाच्या आयुष्यात कधीही न भरून येणारी जखम देऊन गेला. पहाटे साडेपाच वाजता रजनीश आपले काम आटोपून आईला भेटण्यासाठी संगमनेरला येण्याच्या तयारीत होता. दिवाळी पाडव्याला आईला भेटण्याचे त्याने वचन दिले होते. आता काम पूर्ण झाले होते. आईला भेटण्याची ओढ त्याच्या मनात होती. कुटुंबीयांनाही आपल्या लाडक्या मुलाच्या आगमनाची प्रतीक्षा होती. मात्र, त्याच वेळी अचानक त्याला चक्कर आली आणि तो बेशुद्ध पडला. पुण्यातील फ्लॅटवर तो एकटाच असल्याने त्याला वेळेवर मदत मिळू शकली नाही. दुपारच्या सुमारास ही काळीज पिळवटून टाकणारी बातमी कुटुंबीयांना समजली. क्षणभर कोणाचाही विश्वास बसत नव्हता. ज्याच्या भविष्याची सुंदर स्वप्ने पाहिली होती, जो काही दिवसांत घरी येणार होता, जो आईला जग फिरवून आणण्याचे वचन देत होता, त्याच्याबाबत अशी बातमी कशी काय असू शकते? आई-वडील, भाऊ, आजी-आजोबा, मामा आणि नातेवाईक यांच्यावर जणू दुःखाचा डोंगरच कोसळला. जीवाच्या आकांताने सर्वांनी पुण्याकडे धाव घेतली. मनात एकच आशा होती... आपला रजनीश बरा होईल, तो पुन्हा डोळे उघडेल, आपल्याशी बोलेल आणि नेहमीप्रमाणे हसत आपल्याला भेटेल. मात्र, सायंकाळी सव्वासहा वाजता आलेला तो एक निरोप सर्व आशा संपवून गेला...

रजनीश इज नो मोअर!

या चार शब्दांनी संपूर्ण कुटुंबाच्या आयुष्यात कायमचा अंधार पसरला. ज्या घरात रजनीशच्या हसण्याने आनंद फुलत होता त्या घरात क्षणात आक्रोश आणि अश्रूंचा महापूर आला. कुटुंबीयांसाठी हा केवळ एका व्यक्तीचा मृत्यू नव्हता, तर एका सुंदर भविष्याचा, असंख्य स्वप्नांचा आणि आनंदाने भरलेल्या आयुष्याचा अकाली झालेला अंत होता.

दिवाळीचे दिवे घराघरांत उजळत होते,
पण एका घरात दुःखाचे ढग दाटत होते.
ज्याच्या स्वागतासाठी डोळे आतुर झाले होते,
त्याच्यासाठी अश्रूंनी अखेरचे दिवे पेटत होते...!

आईच्या प्रतीक्षेला आता उत्तर कोण देणार?

रजनीशने आईला सांगितले होते, आई, मी दिवाळी पाडव्याला नक्की येईन. आईनेही आपल्या मुलाच्या येण्याची किती स्वप्ने पाहिली असतील! त्याच्या आवडीचे पदार्थ, त्याच्याशी करायच्या गप्पा, त्याच्या कामाविषयी जाणून घेण्याची उत्सुकता त्याच्या पुढील यशाचे कौतुक आणि त्याला जवळ घेऊन मायेने कुरवाळण्याची इच्छा... मात्र नियतीने आईच्या या सर्व स्वप्नांचा क्षणात चुराडा केला. आजही घरातील प्रत्येक क्षणी रजनीशची आठवण येते. त्याची खोली, त्याच्या वस्तू, त्याचा आवाज, त्याचे बोलणे, त्याने केलेले हट्ट आणि आईला दिलेली आश्वासने... सगळे काही तसेच आहे. फक्त त्या घरातील लाडका रजनीश आता परत येणार नाही, ही कटू वस्तुस्थिती स्वीकारणे अशक्य होत आहे. आईच्या डोळ्यांत आजही आपल्या मुलाच्या परतीची आस आहे. वडिलांच्या मनात मुलाने उभे केलेल्या स्वप्नांचा अभिमान आणि त्याच वेळी त्याला गमावल्याचे दुःख आहे. मोठा भाऊ नचिकेतसाठी हा आयुष्यभराची पोकळी निर्माण करणारा आघात आहे. आजी-आजोबा आणि मामांसाठी लाडक्या नातवाच्या आठवणींचा हा न संपणारा प्रवास आहे.

दारात नजर लावून बसली आहे आई,
पावलांचा आवाज ऐकण्यासाठी आतुर झाली आहे आई.
'आई, आलो गं!' एवढेच शब्द ऐकायचे आहेत तिला,
पण नियतीने हिरावून नेला तिचा काळजाचा तुकडा...!
रजनीश, तुझी स्वप्ने अपूर्ण राहिली; पण तुझे कर्तृत्व कायम राहील!

अवघ्या वीस वर्षांच्या आयुष्यात रजनीशने जे काही मिळवले, ते अनेकांना प्रदीर्घ आयुष्यातही साध्य करता येणार नाही. शिक्षण, खेळ, वाचन, तंत्रज्ञान, उद्योजकता, सामाजिक जाणीव, मैत्री आणि कुटुंबाविषयीचे प्रेम अशा विविध गुणांचा संगम त्याच्या व्यक्तिमत्त्वात होता. त्याने स्वतःची कंपनी उभी केली. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. रोजगारनिर्मितीचे स्वप्न पाहिले. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा विचार केला. गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करण्याचे नियोजन केले. आई-वडिलांना सुखाचे दिवस दाखविण्याचा निर्धार केला. त्याच्या आयुष्याची वर्षे कमी होती; पण त्याच्या स्वप्नांची उंची अफाट होती. आज त्याने सुरू केलेल्या कामांकडे, त्याच्या विचारांकडे आणि त्याने निर्माण केलेल्या नात्यांकडे पाहिले की एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते-माणसाचे आयुष्य किती मोठे होते, यापेक्षा त्या आयुष्यात त्याने किती मोठा विचार केला आणि किती माणसांच्या मनात स्थान निर्माण केले, हे अधिक महत्त्वाचे असते. रजनीशच्या जाण्याने त्याच्या कुटुंबीयांना, मित्रपरिवाराला आणि त्याच्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला मोठा धक्का बसला आहे. मात्र, त्याची जिद्द, त्याची स्वप्ने, त्याची समाजाभिमुख दृष्टी आणि त्याचे प्रेमळ व्यक्तिमत्त्व या आठवणी कायम प्रेरणा देत राहतील. त्याच्या जीवनप्रवासातून आजच्या तरुण पिढीने एक महत्त्वाचा संदेश घ्यावा. मोठी स्वप्ने पाहावीत, त्यासाठी अथक मेहनत घ्यावी; पण या धावपळीत आरोग्य, वेळेवर आहार, पुरेशी विश्रांती आणि कुटुंबीयांचे प्रेम यांकडे दुर्लक्ष करू नये. यश मिळविण्याच्या प्रवासात स्वतःचे आरोग्य जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

शेवटचा निरोप... पण आठवणींचा अंत नाही!

रजनीश, आज तुझ्या दशक्रियेच्या निमित्ताने तुझ्या आठवणींचा हा पट उलगडताना शब्दही अपुरे पडत आहेत. तुझ्या आयुष्याचा हा प्रवास लिहिताना प्रत्येक शब्दासोबत डोळ्यांत अश्रू तरळत आहेत. अरे बाळा, तू तर आईला विमानातून जग फिरवून आणण्याचे वचन दिले होतेस! तू म्हणाला होतास, आई, फक्त थोडे दिवस थांब... पण त्या थोड्या दिवसांची वाट पाहणाऱ्या आईला तू कायमची प्रतीक्षा देऊन गेलास. तुला अजून खूप काही करायचे होते. तुझी कंपनी मोठी करायची होती. तुझे तंत्रज्ञान जगभर पोहोचवायचे होते. आपल्या गावाचे नाव मोठे करायचे होते. आई-वडिलांच्या कष्टांचे चीज करायचे होते. गरजूंच्या आयुष्यात आनंद निर्माण करायचा होता. स्वतःच्या मेहनतीने आभाळाला गवसणी घालायची होती. पण नियतीने तुझ्या स्वप्नांच्या भरारीला अचानक पूर्णविराम दिला. तू आज आमच्यात नाहीस, ही वस्तुस्थिती मनाला पटत नाही. तुझ्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. मात्र, तू जगलेला प्रत्येक क्षण, तुझ्या कर्तृत्वाचा प्रत्येक टप्पा, तुझ्या स्वप्नातील प्रत्येक रंग आणि तुझ्या प्रेमाचा प्रत्येक स्पर्श आमच्या मनात कायम जिवंत राहील.

तू निघून गेलास, पण तुझी स्वप्ने इथेच राहिली,
तुझ्या आठवणींची फुले मनाच्या अंगणात फुलली.
आयुष्याच्या पुस्तकातील पाने अचानक संपली,
पण तुझ्या कर्तृत्वाची कहाणी काळाच्या पटलावर कोरली गेली...!
आणखी एक शेवटची चारोळी...
नियतीने हिरावून नेले आयुष्याचे सोनेरी क्षण,
पण तुझ्या आठवणींनी उजळत राहील प्रत्येक क्षण.
तू नसशील सोबत, तरी मनात सदैव राहशील,
रजनीश, आमच्या हृदयात तू अजरामर राहशील...!

बाळा रजनीश, तू जिथे कुठे असशील तिथे सुखी राहा! तुझ्या अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांची सल कायम मनात राहील; पण तुझ्या विचारांचा सुगंध, तुझे कर्तृत्व आणि तुझ्या प्रेमळ आठवणी आमच्या हृदयात सदैव तेवत राहतील.

आमच्या लाडक्या रजनीशला भावपूर्ण श्रद्धांजली!

– अनिल किसन कडलग
प्राथमिक शिक्षक
जि. प. प्राथमिक शाळा, निळवंडे
समन्वयक, आधार फाउंडेशन, संगमनेर



हे जगन्नियंत्या ...

हे जगन्नियंत्या, उभारून मुडद्यांचे मांडव,
सुरूच ठेवले आहेस तू तुझे हे मृत्यूचे तांडव...
तळहाताच्या फोडाप्रमाणे जपतो आम्ही आमचे अंकुर,
पण क्षणात करतोस तू सारेच क्षणभंगुर,

या क्रूर खेळाला अपवाद नाहीत कौरव – पांडव,
हे जगन्नियंत्या, उभारून मुडद्यांचे मांडव,
सुरूच ठेवले आहेस तू तुझे हे मृत्यूचे तांडव...

तूच असतोस आमच्या सुखातही –विरहातही,
तूच असतोस आमच्या श्वासात अन् प्रत्येक क्रियेतही,
तूच उभे करतोस हे सुख–दुःखांचे डोंगर,
अन् तूच फिरवतोस आमच्या सुखावर गाढवाचा नांगर,

आमच्या बाळाची गाठून एकाकी वेळ
नियतीने कसा केला हा क्रूर खेळ
तुला कशी नाही रे आली कणव,
हे जगन्नियंत्या, उभारून मुडद्यांचे मांडव,
सुरूच ठेवले आहेस तू तुझे हे मृत्यूचे तांडव...

भजतो आम्ही तुला सदा, तुझेच करतो नित्य स्मरण,
तरीही का बांधलेस दारात आमच्या मृत्यूचे तोरण?
निष्पाप जीवांना जवळ घेण्याची ही कसली तुझी रे धडपड?
म्हणूनच घडवून आणतोस ना साऱ्या जगाची पडझड?

उध्वस्त केलेस तू सारे आमचे आनंदाचे गाव,
हे जगन्नियंत्या, उभारून मुडद्यांचे मांडव,
सुरूच ठेवले आहेस तू तुझे हे मृत्यूचे तांडव...

लाडका असेल तुझाही तो, तुझीही असेल त्याच्यावर माया,
पण आम्हालाही हवी होती रे,
आमच्या राजकुमारासारख्या लेकराची छाया,
का झालास इतका निष ठुर
का केलेस बाळाला आई पासून दूर..

चहूबाजुनी काळोखाचे मेघ आता लागलेत घेरू
हे जगन्नियंत्या..तूच सावर...
कोसळला आज हा निश्चयाचा महामेरू!

आठवणींच्या या सागरात, कशी तरणार माझी नाव?
हे जगन्नियंत्या, उभारून मुडद्यांचे मांडव,
सुरूच ठेवले आहेस तू तुझे हे मृत्यूचे तांडव...

जीवनाच्या या संध्याकाळी, अंधारून आल्यात दाही दिशा,
तुझ्याविना रे बाळा, हरवून गेली जगण्याची आशा,

आर्त टाहो फोडून आई बोलावतेय अहर्निश
तू आमच्या काळजाचा तुकडा, आमचा प्राण,
कुठे गेलास रे रजनीश...
लाडक्या बाळा.. रजनीश तुला भावपुर्ण श्रद्धांजली...

तुझे.... आई-बाबा